दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


**आजचे पंचांग**

दिनांक : १ सप्टेंबर २०२६ वार : मंगळवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : चतुर्थी तिथी (सकाळी ०७:४१ पर्यंत) त्यानंतर पंचमी तिथी नक्षत्र : अश्विनी नक्षत्र (२ सप्टेंबर पहाटे ०२:४१ पर्यंत) त्यानंतर भरणी नक्षत्र योग : वृद्धि योग (रात्री ११:३८ पर्यंत) त्यानंतर ध्रुव योग करण : बलवा करण (सकाळी ०७:४१ पर्यंत) त्यानंतर कौलव करण (सायंकाळी ०६:५९ पर्यंत)

**२७० जणांसह प्रवासी जहाज उलटलं**

**पुणे :** उत्तर सायप्रसच्या किनाऱ्याजवळ सुमारे २७० प्रवाशांना घेऊन जाणारे एक प्रवासी जहाज उलटल्याची अत्यंत दुर्दैवी आणि मोठी घटना समोर आली आहे. क्रेनिया बंदरानिकट समुद्रात घडलेल्या या अपघातामुळे खळबळ उडाली असून, प्रशासनाकडून तात्काळ युद्धपातळीवर शोध व बचाव मोहीम हाती घेण्यात आली आहे. तुर्कस्तानच्या गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, या जहाजावर एकूण २५९ प्रवासी आणि ८ असे एकूण २६७ ते २७० लोक सवार होते.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६ | वर्ष - १ | अंक - ३३४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो कार्यालयातून हटविल्याप्रकरणी मनसेचे अमित ठाकरे यांच्यासह २० ते २५ कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

शासकीय तंत्र निकेतन या संस्थेच्या कार्यालयात शिरुन तेथे असलेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो हटविल्याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांनी मनसेचे विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित राज ठाकरे यांच्यासह २० ते २५ कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत डॉ. राजेंद्र काशिराम पाटील (वय ५२, रा. डावी भुसारी कॉलनी, कोथरुड) यांनी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना गणेशखिंड रोडवरील शासकीय तंत्रनिकेतन मध्ये सोमवारी दुपारी साडेबारा ते एक वाजेच्या दरम्यान घडली.

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना पक्षाचे अध्यक्ष अमित ठाकरे यांचा आज पुणे दौरा होता. ते या दौर्‍यांमध्ये विविध शिक्षण संस्थांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधणार असल्याचे सांगण्यात आले होते. त्यानुसार सोमवारी दुपारी ते गणेशखिंड रोडवर शासकीय तंत्र निकेतनमध्ये आले होते. त्यांच्याबरोबर २० ते २५ कार्यकर्ते होते. त्यांनी विद्यार्थ्यांची भेट घेतल्यानंतर कार्यालयात विनापरवाना कार्यालयात शिरले. कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज, त्याच्या शेजारी पंतप्रधान नरेंद्र मोदी, त्याच्या शेजारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे फोटो आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शेजारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो कशाला असा सवाल कार्यकर्त्यांनी करुन मोदी यांचा फोटो काढून घेतला. फिर्यादी डॉ. राजेंद्र पाटील व इतर सहकारी यांना धमकावुन कार्यालयात थांबुन जोरजोरात घोषणा देऊन गोंधळ घातला आहे. अमित राज ठाकरे व त्यांच्यासोबतच्या २० ते २५ कार्यकर्त्यावर विनापरवाना प्रवेश करुन गोंधळ घातल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक शितल जाधव तपास करीत आहेत.

# सीजेपीच्या मोर्चाला कोर्टाचा दिलासा; मग याचिकेचा ‘रिमोट’ कुणाच्या हातात?

## ५ सप्टेंबरच्या आंदोलनावर बंदीची मागणी फेटाळली; विद्यार्थ्यांवरील एफआयआर मागे घेण्यासाठी सरकारच सर्वोच्च न्यायालयात

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली / वृत्तसंस्था

कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत नियोजित निषेध मोर्चावर बंदी घालण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळून लावली. आंदोलनकर्त्यांनी आणि प्रशासनाने कायद्याच्या चौकटीत राहून शांततापूर्ण पद्धतीने वागावे, असे स्पष्ट निर्देश देताना न्यायालयाने कोणत्याही एका बाजूची बाजू घेतल्याचे दिसू दिले नाही. मात्र,

या याचिकेच्या पार्श्वभूमीवर ही न्यायालयीन लढाई नेमकी कुणाच्या सांगण्यावरून उभी राहिली आणि तिच्यामागे राजकीय ‘रिमोट कंट्रोल’ आहे का?, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

दिल्ली पोलिसांचे निवृत्त अधिकारी राजेंद्र सिंह यांनी सीजेपीच्या मोर्चावर बंदी घालण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली होती. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने मोर्चाला थेट बंदी घालण्यास नकार दिला. याचिकाकर्त्यांनी आपली चिंता नीट-यूजी आंदोलनादरम्यान कथित पोलिस हिंसाचाराच्या चौकशीसाठी स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीसमोर मांडावी, असेही न्यायालयाने सांगितले.

विशेष म्हणजे, न्यायालयाच्या निरीक्षणात एक महत्त्वाचा मुद्दा



स्पष्ट झाला लोकशाहीतील आंदोलनाचा अधिकार आणि कायदा-सुव्यवस्था या दोन्हींचे संतुलन राखण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. त्यामुळे आंदोलन होऊ नये म्हणून न्यायालयाचा आधार घेण्याचा प्रयत्न कितपत योग्य होता, यावरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

या प्रकरणाला आणखी राजकीय रंग देणारी बाब म्हणजे विद्यार्थ्यांवरील एफआयआर. जुलै महिन्यातील विद्यार्थी आंदोलनानंतर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यासाठी केंद्र सरकारनेच आता सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याचा निर्णय घेतला आहे. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरन्यायाधीशांच्या खंडपीठासमोर हा विषय मांडून तातडीच्या सुनावणीची मागणी केली.

एकीकडे आंदोलनावर बंदीची मागणी करणारी याचिका दाखल होते आणि दुसरीकडे त्याच आंदोलनाशी संबंधित विद्यार्थ्यांवरील एफआयआर मागे घेण्यासाठी सरकार पुढे येते. या परस्परविरोधी भूमिकांमुळे केंद्राच्या धोरणामागे नेमका राजकीय हिशेब काय आहे, हा प्रश्न अधिक तीव्र होतो.

सीजेपीच्या आंदोलनाला भाजपचा थेट किंवा पडद्यामागील पाठिंबा असल्याचा ठोस पुरावा या प्रकरणातून समोर आलेला नाही. मात्र, राजकीय समीकरणे, न्यायालयीन याचिका आणि सरकारची बदलती भूमिका यांची वेळ एकाच दिशेने जात असल्याने संशयाला वाव मिळत आहे.

लोकशाहीत आंदोलन कोणाचेही असो, त्याला राजकीय चष्म्यातून पाहण्याऐवजी सरकारने पारदर्शक भूमिका घ्यावी आणि न्यायालयीन प्रक्रियेचा वापर राजकीय सोयीसाठी होणार नाही, याची खात्री करावी, एवढीच अपेक्षा.

# आरक्षणाचा प्रश्नही राजकारणाच्या चष्म्यातूनच का?

## जरांगेंचे आव्हान, शिंदेंची भूमिका आणि फडणवीसांची कोंडी; मराठा प्रश्नावर ‘जबाबदारी’पेक्षा राजकीय गणित महत्त्वाचे ठरतेय का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
जालना / प्रतिनिधी :

मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा पेटला आहे. अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांचे बेमुदत उपोषण तिसऱ्या दिवशीही सुरू असून, मागण्या मान्य झाल्याशिवाय माघार घेणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. १२ सप्टेंबरपर्यंत सरकारने निर्णय घ्यावा, अन्यथा मुंबईकडे कूच करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

या पार्श्वभूमीवर मात्र एक प्रश्न अधिक गंभीरपणे समोर येतोसरकार मराठा आरक्षणाकडे सामाजिक न्यायाचा प्रश्न म्हणून पाहते की निवडणुकीच्या राजकीय गणितातून?

जरांगे यांनी ५८ लाख नोंदींच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातच थेट आव्हान उभे केले आहे. ‘नोंदी सापडल्या नाहीत’ असे फडणवीसांनी सांगावे किंवा



‘नोंदी सापडल्या आहेत’ असे शिंदेंनी स्पष्ट करावे, अशी त्यांची मागणी आहे. या वक्तव्यामुळे सरकारमधील अंतर्गत भूमिकांबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

फडणवीस सरकारसमोर आता केवळ आंदोलन हाताळण्याचे आव्हान नाही; आपल्या धोरणाची स्पष्टता सिद्ध करण्याचे आव्हान आहे. मात्र महाराष्ट्राच्या राजकारणात प्रत्येक सामाजिक प्रश्नाकडे सत्तेची समीकरणे, मतदारसंघांचे गणित आणि राजकीय श्रेय यांच्या माध्यमातून पाहिले जात असल्याची भावना वाढत आहे.

मराठा आरक्षण हा केवळ निवडणुकीचा मुद्दा नाही. तो लाखो तरुणांच्या शिक्षण, रोजगार आणि भविष्यासोबत जोडलेला प्रश्न आहे. त्यामुळे ‘कोणाचे श्रेय?’ किंवा ‘कोणाची राजकीय बाजू मजबूत होईल?’ यापेक्षा कायदेशीरदृष्ट्या टिकणारा आणि सर्वमान्य मार्ग कोणता? याचे उत्तर सरकारने द्यायला हवे.

जरांगे आंदोलन करतील, सरकार चर्चा करेल, नेते आरोप-प्रत्यारोप करतील आणि पुन्हा राजकीय समीकरणे मांडली जातीलअसे चक्र सुरू राहिले, तर सर्वात मोठा तोटा आंदोलनकर्त्यांचा आणि राज्यातील सामाजिक सलोख्याचा होईल.

फडणवीसांनी प्रत्येक प्रश्नाकडे राजकीय कोनातूनच पाहण्याऐवजी आरक्षणाच्या प्रश्नाला राजकीय फायद्यापलीकडे नेऊन कायदेशीर, प्रशासकीय आणि सामाजिक तोडगा देण्याची वेळ आली आहे. कारण मराठा समाजाला आश्वासनांची नव्हे, तर स्पष्ट आणि टिकाऊ निर्णयाची गरज आहे.

# मुंबईऐवजी जरांगेंच्या आंदोलनाचा केंद्रबिंदू दिल्लीकडे; ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे/ वृत्तसेवा

‘मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्या आंदोलनाची दिशा आणि आंदोलनाचे केंद्र बदलले असून, पूर्वी मुंबई आणि ठाण्याभोवती असलेले आंदोलनाचे केंद्र आता दिल्लीकडे सरकले आहे. गरीब मराठ्यांच्या प्रश्नापेक्षा सत्तेच्या राजकारणातील पटावरचा खेळ या आंदोलनात अधिक असल्याचे दिसत आहे,’ असा दावा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी पत्रकारांशी बोलताना केला. बेरोजगार आणि त्रस्त तरुण मराठा वर्गाने कोणाच्या नादी लागू नये, असे आवाहनही त्यांनी केले. ‘जरांगे यांना पाठिंबा देणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, भाजप आणि शिवसेनेतील मराठा नेत्यांनी ही मागणी कधीच मान्य होणार नाही, हे सांगण्याची हिंमत दाखवावी.

आंबेडकर म्हणाले, मागण्याच अशा करायच्या की ज्या मान्यच होणार नाहीत आणि त्यातून डोके भडकवण्याचे काम सुरू ठेवायचे, या गोष्टीला आता आळा बसला पाहिजे. सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेपणा सिद्ध करण्यासाठी आवश्यक माहिती आणि आकडेवारी सरकारने न्यायालयासमोर ठेवावी. ती घटनेच्या चौकटीत आहे की नाही, याची तपासणी करून न्यायालय निर्णय देईल. मात्र, कोणत्यातरी प्रवर्गात जाऊन आरक्षण मागताना त्या प्रवर्गाचे निकष पूर्ण करावे लागतात. ओबीसी नेत्यांमध्ये एकवाक्यता नसल्याचे दिसत असले तरी, लढणारा ओबीसी वर्ग आणि ओढून-ताणून ओबीसींचे नेतृत्व करणारा वर्ग वेगळा आहे. त्यामुळे ओबीसी नेत्यांनीच या प्रश्नावर अधिक बोलणे योग्य ठरेल.’ ‘राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांचे अमेरिकेतील भाषण ऐकले असेल. आपण सर्वांना सोबत घेऊन चालतो, असे जगाला सांगायचे आणि भारतात आल्यानंतर एकमेकांना दूर लोटायचे, अशी दुटप्पी भूमिका चळवळीत आणि राजकारणात असू नये,’ अशी टिप्पणी आंबेडकर यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळालेल्या पुरस्काराबाबत मिळाल्याबाबत ‘भारतामध्ये एक पुरस्कार घेता आला नाही आणि छोट्या देशांना धमकावून पुरस्कार घेत आहेत,’ अशी टीका आंबेडकर यांनी केली.

# सीसीटीव्हीमुळे पारदर्शकता वाढेल; पण भरतीतील संपूर्ण गैरप्रकार थांबतील का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी :

राज्यातील अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये ५,०१२ सहाय्यक प्राध्यापकांच्या भरतीला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. तब्बल हजारो उमेदवारांच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या या भरती प्रक्रियेत गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी मुलाखतींचे सीसीटीव्ही रेकॉर्डिंग अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे भरती प्रक्रियेत पारदर्शकतेचा मुद्दा पुन्हा केंद्रस्थानी आला आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार, ऑक्टोबर २०२५ पर्यंतची विद्यार्थी संख्या आणि अध्यापनाचा कार्यभार लक्षात घेऊन पदांना मंजुरी देण्यात आली आहे. भरतीच्या जाहिरातींना विद्यापीठाची मंजुरी, राष्ट्रीय व राज्यस्तरीय वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्धी, ऑनलाइन तसेच ऑफलाइन अर्ज स्वीकारण्याची मुभा आणि यूजीसीच्या निकषांनुसार निवड अशी प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे.

मात्र, पारदर्शकता म्हणजे फक्त मुलाखतीच्या खोलीत कॅमेरा लावणे नव्हे. जाहिरात कोणत्या पद्धतीने प्रसिद्ध झाली, पात्रतेचे निकष सर्व उमेदवारांसाठी समान होते का, अर्जांची छाननी कशी झाली, मुलाखतीत गुण कसे देण्यात आले आणि अंतिम निवडीत गुणवत्ता व आरक्षणाचे निकष काटेकोरपणे पाळले गेले काया प्रत्येक प्रश्नाचे उत्तरही तितकेच स्पष्ट असणे आवश्यक आहे.

सीसीटीव्ही रेकॉर्डिंग किमान एक वर्ष सुरक्षित ठेवण्याचा निर्णय निश्चितच महत्त्वाचा आहे. तक्रार, आक्षेप, चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही सुरू असल्यास रेकॉर्डिंग नष्ट करता येणार नाही, ही तरतूदही उमेदवारांच्या दृष्टीने संरक्षणात्मक ठरू शकते.

पण खरी परीक्षा रेकॉर्डिंगची नाही, तर त्याच्या वापराची आहे. एखाद्या उमेदवाराने निवड प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केला, तर त्याची तक्रार निष्पक्षपणे तपासली जाणार का? मुलाखतीतील गुणांकनावर आक्षेप घेण्याची प्रभावी यंत्रणा असेल का? निवड समितीच्या निर्णयांची कारणमीमांसा उपलब्ध करून दिली जाणार का? या प्रश्नांची उत्तरे स्पष्ट नसतील तर कॅमेरे असूनही पारदर्शकतेची हमी अधुरीच राहील. निवड निकष आणि निवडलेल्या उमेदवारांची यादी महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे निर्देश स्वागतार्ह आहेत. मात्र पारदर्शकता ‘दाखवण्याची’ नव्हे, तर ‘तपासता येण्याची’ व्यवस्था असली पाहिजे.

५,०१२ पदांची ही भरती हजारो तरुणांच्या करिअरशी जोडलेली आहे. त्यामुळे सीसीटीव्ही हा पहिला टप्पा ठरू शकतो; अंतिम उत्तर नाही.

कॅमेरा भरतीच्या खोलीत बसला म्हणून पारदर्शकता निर्माण होत नाही; निर्णय घेणाऱ्या व्यवस्थेवरही सार्वजनिक विश्वास निर्माण झाला, तेव्हाच खरी पारदर्शकता सिद्ध होईल.

# इथेनॉलच्या ‘टक्केवारी’वर सर्वोच्च न्यायालयाची नो-एंट्री; पारदर्शकतेचा प्रश्न मात्र कायम!

## पीआयएल फेटाळली, उच्च न्यायालयाचा मार्ग खुला; ‘काय विकत घेतोय?’ या साध्या प्रश्नाचे उत्तर देण्याची जबाबदारी कुणाची?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी :
दिल्ली / वृत्तसंस्था :

पेट्रोलमध्ये नेमके किती टक्के इथेनॉल मिसळले आहे, ग्राहकाला त्याची माहिती मिळावी, पंपावरील बिलावर इथेनॉलचे प्रमाण नमूद करावे आणि कोणत्या वाहनाला कोणते इथेनॉल-ब्लेंड पेट्रोल योग्य आहे, याबाबत अधिकृत माहिती सार्वजनिक करावी, या मागणीसाठी दाखल करण्यात आलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळून लावली. मात्र, याचिकाकर्त्याला संबंधित उच्च न्यायालयात दाद मागण्याची मुभा देण्यात आली आहे.

याचिका फेटाळली म्हणजे इथेनॉलच्या प्रमाणाबाबत नागरिकांना माहिती मिळण्याचा अधिकारच नाही, असा त्याचा अर्थ काढणे चुकीचे ठरेल. न्यायालयाने या टप्प्यावर हस्तक्षेप करण्यास नकार दिला असून, योग्य दिलासा मिळवण्यासाठी उच्च न्यायालयाचा मार्ग खुला ठेवला आहे. त्यामुळे मूळ प्रश्न अद्याप संपलेला नाही.

याचिकाकर्ते ॲड. एन. के. गोस्वामी यांनी न्यायालयात मांडलेला मुद्दा साधा आहेग्राहकाने नेमके काय खरेदी केले, हे त्याला कळायला नको का? पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण किती आहे, हे पंपाच्या डिस्प्लेवर किंवा बिलावर स्पष्ट झाले, तर ग्राहकाला आपल्या वाहनासाठी योग्य इंधन निवडणे अधिक सोपे होईल, असा युक्तिवाद करण्यात आला.

मात्र, अटॉर्नी जनरल यांनी याचिकेला विरोध करत ती ‘प्रॉक्सी पिटिशन’ असल्याचे सांगितले आणि यापूर्वी अशाच प्रकारची याचिका फेटाळल्याची न्यायालयाला आठवण करून दिली. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने याचिकेत हस्तक्षेप न करता उच्च न्यायालयात जाण्याचा पर्याय दिला.

इथेच पारदर्शकतेचा मोठा प्रश्न उभा राहतो. एखादी याचिका प्रक्रियात्मक किंवा अधिकारक्षेत्राच्या कारणामुळे फेटाळली जाऊ शकते; परंतु त्यामुळे नागरिकांच्या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. पेट्रोलमध्ये नेमके काय मिसळले आहे, वाहनाच्या इंजिनवर त्याचा काय परिणाम होऊ शकतो, कोणत्या वाहनासाठी कोणते ब्लेंड योग्य आहे आणि ग्राहकाने त्यासाठी किती पैसे मोजलेया प्रश्नांवर सरकार आणि तेल कंपन्यांनी स्पष्ट, सहज उपलब्ध आणि एकसमान माहिती देणे अपेक्षित आहे.

या प्रकरणाला ‘र्एीींशळप शषषशलीं’शी थेट जोडणे योग्य ठरणार नाही. र्एीींशळप प्रकरणात सत्ता, गोपनीयता आणि गंभीर गुन्ह्यांशी संबंधित प्रश्न होते; इथेनॉल प्रकरणात तसा कोणताही संबंध सिद्ध झालेला नाही. मात्र, दोन्हींच्या संदर्भात ‘माहिती कोणाकडे आहे आणि ती सार्वजनिक किती केली जाते?’ हा व्यापक पारदर्शकतेचा प्रश्न चर्चेत येऊ शकतो.

सर्वोच्च न्यायालयाने दार बंद केलेले नाही; उच्च न्यायालयाचा दरवाजा दाखवला आहे. त्यामुळे आता खरी कसोटी सरकारची आहे. नागरिकांना माहिती देणे ही सरकारची जबाबदारी आहे की माहिती मागण्यासाठी प्रत्येक वेळी नागरिकांनी न्यायालयात धाव घ्यायची? हा प्रश्न इथेनॉलपेक्षा मोठा आहे.

पारदर्शक लोकशाहीत ग्राहकाला ‘काय खरेदी करतोय?’ हे विचारण्याची वेळच येऊ नये; त्याची माहिती त्याला आपोआप मिळायला हवी. अन्यथा पेट्रोलच्या टाकीत इथेनॉल किती आहे यापेक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता किती आहे, हा खरा प्रश्न ठरेल.

## संपादकीय

### आदिवासींच्या नावाने राजकारण, वस्तीगृहांच्या दारात खासगीकरण! भाजप-आरएसएसच्या 'समरसते'चा खरा चेहरा कोणता?

आदिवासी समाजाच्या नावाने मेळावे घ्यायचे, आदिवासी महापुरुषांच्या जयंती–पुण्यतिथींना पुष्पहार अर्पण करायचे, 'जनजातीय गौरव'च्या घोषणा द्यायच्या आणि दुसऱ्या बाजूला आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उभी केलेली सरकारी व्यवस्था हळूहळू खासगी हातांकडे सोपवायची हा विरोधाभास आता महाराष्ट्राने गंभीरपणे तपासण्याची वेळ आली आहे.

राज्यातील ४१० शासकीय आदिवासी वस्तीगृहांमध्ये विविध उपक्रम राबविण्याच्या नावाखाली खासगी संस्थेला प्रवेश देण्याचा निर्णय त्यामुळेच केवळ प्रशासनिक बाब राहत नाही. तो सरकारच्या आदिवासी धोरणाच्या दिशेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा निर्णय ठरतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने याचे उत्तर द्यायलाच हवे.

भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहाशी जोडण्याची भाषा करतात. 'वनवासी', 'जनजातीय गौरव', 'समरसता' अशा विविध संकल्पनांच्या माध्यमातून आदिवासी समाजाशी जवळीक साधण्याचा राजकीय प्रयत्न केला जातो. परंतु खरी कसोटी घोषणांची नसते; सत्तेच्या निर्णयांमध्ये आदिवासींच्या हक्कांना किती स्थान दिले जाते, याची असते. आणि इथेच प्रश्न उभा राहतो. आदिवासी विद्यार्थ्यांची सरकारी वस्तीगृहे ही सरकारी जबाबदारी आहेत. त्यांच्या निवासाची, सुरक्षेची, भोजनाची, शिक्षणाच्या वातावरणाची आणि सर्वांगीण विकासाची जबाबदारी राज्याची आहे. मग ही जबाबदारी टप्प्याटप्प्याने खासगी संस्थांकडे का ढकलली जात आहे? आज उपक्रमांच्या नावाखाली खासगी संस्थेला प्रवेश; उद्या व्यवस्थापन; परवा आणखी एखादी सरकारी जबाबदारीखासगीकरणाची ही दारे नेमकी कुठे जाऊन उघडणार आहेत? सरकारने याचे उत्तर द्यावे. विशेषतः ज्या संस्थेला वस्तीगृहांमध्ये काम करण्याची संधी दिली जात आहे, तिची निवड कोणत्या प्रक्रियेतून झाली? इतर संस्थांना समान संधी देण्यात आली का? निविदा काढली होती का? तज्ज्ञ समिती होती का? करारातील अटी काय आहेत? खासगी संस्थेला विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचे किती अधिकार आहेत? कार्यक्रमांचे विषय कोण ठरवणार? हे प्रश्न विचारले की सरकारला जर अस्वस्थ वाटत असेल, तर अस्वस्थ व्हायलाच हवे. कारण लोकशाहीत प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही; उलट प्रश्न न विचारणे हा समाजासाठी अधिक धोकादायक प्रकार आहे. 'व्यक्तिमत्त्व विकास' या नावाखाली विद्यार्थ्यांमध्ये कोणते विचार रुजवले जाणार, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना संविधान, विज्ञान, विवेक, समानता, सामाजिक न्याय आणि लोकशाहीची मूल्ये शिकवली पाहिजेत. त्यांना सक्षम नागरिक बनवणे हा उद्देश असला पाहिजे. परंतु सरकारी वस्तीगृहांना कोणत्याही राजकीय किंवा वैचारिक प्रयोगाचे मैदान बनवले जाणार नाही, याची हमी सरकारने द्यायलाच हवी. भाजप–आरएसएसच्या राजकारणावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याचे कारण याच ठिकाणी आहे. आदिवासी समाज हा मतपेटी आहे की स्वतंत्र अस्मिता असलेला नागरिकसमूह? आदिवासींच्या संस्कृतीचा सन्मान करायचा असेल तर त्यांच्या जमिनी, शिक्षण, रोजगार, आरोग्य, सुरक्षितता आणि सामाजिक अधिकारांवरही तितक्याच ताकदीने बोलावे लागेल. फक्त आदिवासींच्या नावाने राजकीय कार्यक्रम घेणे आणि प्रत्यक्षात सरकारी संस्थांची जबाबदारी कमी करणे, हा विकासाचा पर्याय असू शकत नाही. फडणवीस सरकारसमोर आज खरी कसोटी आहे. सरकार आदिवासी विकास विभागाला सक्षम करणार की खासगी संस्थांच्या मदतीवर अवलंबून ठेवणार? रिक्त पदे भरणार की बाह्य संस्थांना जबाबदाऱ्या देणार? वस्तीगृहांच्या पायाभूत सुविधा सुधारणार की कार्यक्रमांच्या माध्यमातून विकासाचा देखावा उभा करणार? सरकारी वस्तीगृहांमध्ये खानावळ, सुरक्षा आणि इतर व्यवस्थांबाबत आधीच प्रश्न उपस्थित होत असतील, तर त्या प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार भोजन, सुरक्षित परिसर, स्वच्छ निवास, अभ्यासासाठी सुविधा आणि प्रशिक्षित कर्मचारी मिळत नसतील तर सरकारने आधी स्वतःच्या व्यवस्थेचा आरसा पाहावा. सरकारच्या अपयशावर खासगीकरणाचा रंग फासला म्हणून अपयश विकासात बदलत नाही. आणखी एक मूलभूत प्रश्न आहे आदिवासी विद्यार्थ्यांच्या बाबतीत निर्णय घेताना त्यांचा आवाज कुठे आहे? त्यांच्या संघटना, पालक, शिक्षक, माजी विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्याशी व्यापक चर्चा झाली का? की मंत्रालयातील काही अधिकाऱ्यांच्या निर्णयाने हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित धोरण ठरवले जाणार? भाजप–आरएसएसला आदिवासी समाज खरोखरच आपल्या सामाजिक न्यायाच्या अजेंड्याचा भाग वाटत असेल, तर आदिवासी विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी सरकारी संस्था अधिक मजबूत कराव्या लागतील. त्यांच्या हक्कांची जागा कोणतीही खासगी संस्था घेऊ शकत नाही. आदिवासींच्या नावाने राजकारण करणे सोपे आहे. त्यांच्या प्रश्नांवर घोषणा करणे त्याहून सोपे आहे. पण त्यांच्या हक्कांसाठी पैसा खर्च करणे, रिक्त पदे भरणे, वस्तीगृहांची अवस्था सुधारणे, प्रशासनाला जबाबदार धरणे आणि विद्यार्थ्यांना निर्णयप्रक्रियेत स्थान देणे ही खरी राजकीय परीक्षा आहे. म्हणूनच ४१० वस्तीगृहांचा हा मुद्दा छोटा समजण्याची चूक सरकारने करू नये. आज एका 'उपक्रमाचा' प्रश्न आहे; उद्या तो सरकारी नियंत्रणाचा प्रश्न होऊ शकतो. आज खासगी संस्थेला मर्यादित प्रवेश आहे; उद्या सरकारी व्यवस्था कुणाच्या हातात असेल, याची हमी कोण देणार? आदिवासींच्या नावाने 'गौरव' आणि त्यांच्या हक्कांच्या व्यवस्थेत 'खासगीकरण'हा विरोधाभास महाराष्ट्र स्वीकारणार नाही. फडणवीस सरकारने सामंजस्य कराराची संपूर्ण माहिती सार्वजनिक करावी. निवड प्रक्रिया पारदर्शक करावी. विद्यार्थ्यांच्या वैचारिक स्वातंत्र्याची हमी द्यावी आणि वस्तीगृहांची मूलभूत जबाबदारी सरकार स्वतःकडेच ठेवावी. कारण आदिवासी विद्यार्थ्यांना कुणाच्या विचारसरणीची गरज नाही; त्यांना शिक्षणाची, सुरक्षिततेची, समान संधीची आणि संविधानाने दिलेल्या हक्कांची गरज आहे. आदिवासींच्या खांद्यावर हात ठेवून राजकारण करणे वेगळे आणि त्यांच्या हक्कांच्या बाजूने खंबीरपणे उभे राहणे वेगळे. आता महाराष्ट्राने घोषणांपेक्षा कृतीचा हिशेब मागायला हवा.

# कंत्राटी, मानधन कर्मचाऱ्यांनाही ऑनलाइन पगार स्लिप द्या

## हनुमंत लांडगे यांची महापालिका आयुक्तांकडे मागणी; ३० दिवसांत कार्यवाहीचे आदेश देण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील कंत्राटी व मानधन कर्मचाऱ्यांनाही कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे दरमहा ऑनलाइन पगार स्लिप उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी भाजप महाराष्ट्र कामगार सेलचे महासचिव हनुमंत नामदेव लांडगे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. याबाबत त्यांनी ३० ऑगस्ट रोजी आयुक्तांना निवेदन दिले.

महापालिकेत सुमारे ७ हजार ५०० कायम कर्मचारी, तर अंदाजे १५ हजार कंत्राटी व मानधन कर्मचारी कार्यरत असल्याचे लांडगे यांनी निवेदनात म्हटले आहे. कायम कर्मचाऱ्यांना दरमहा ऑनलाइन पगार स्लिप उपलब्ध करून दिली जाते. मात्र, कंत्राटी आणि मानधन कर्मचाऱ्यांना ही सुविधा दिली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

पगार स्लिपअभावी बँक कर्ज, शासकीय योजनांचा लाभ घेताना अडचणी

कंत्राटी व मानधन कर्मचाऱ्यांना पगाराची अधिकृत स्लिप उपलब्ध नसल्यामुळे बँक कर्ज घेणे तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना अडचणी निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पगाराचा अधिकृत दस्तऐवज उपलब्ध होणे हा कर्मचाऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांशी आणि हक्कांशी संबंधित महत्त्वाचा विषय असल्याने प्रशासनाने त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे लांडगे यांनी म्हटले आहे.

या मागणीसंदर्भात यापूर्वीही वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मात्र, प्रशासनाकडून अपेक्षित दखल घेतली जात नसल्याचा आरोप लांडगे यांनी केला. त्यामुळे सामान्य प्रशासन, कामगार कल्याण, लेखा तसेच मुख्य लेखापरीक्षण विभागाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

३० दिवसांत चौकशी करून निर्णय द्या

या प्रकरणी ३० दिवसांच्या आत चौकशी करून योग्य आदेश पारित करावेत आणि त्याची माहिती लेखी किंवा ई-मेलद्वारे द्यावी, अशी मागणी लांडगे यांनी आयुक्तांकडे केली आहे.

दरम्यान, मागणीची दखल न घेतल्यास हा प्रश्न किमान वेतन मंडळ, कामगार कल्याण मंडळ, ईएसआयसी, ईपीएफओ, आयकर विभाग, राज्य व केंद्रीय कामगार आयुक्त, मानवाधिकार आयोग, सफाई कामगार आयोग, जिल्हाधिकारी तसेच न्यायालय आणि लोकप्रतिनिधी यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल, असा इशाराही लांडगे यांनी निवेदनातून दिला आहे.

# हिंजवडीतील मुख्य रस्त्याला बेकायदेशीर अतिक्रमणाचा विळखा

## वाहतूक पोलीस आणि प्रशासनाच्या भूमिकेवर नागरिकांचा तीव्र संताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

हिंजवडी : प्रतिनिधी

येथील शनी मंदिर ते वाकडकर कॉर्नर या मुख्य रस्त्यावर गेल्या काही काळापासून बेकायदेशीर अतिक्रमणाने रौद्ररूप धारण केले आहे. या वाढत्या अतिक्रमणामुळे आणि प्रशासनाच्या कथित दुर्लक्षामुळे स्थानिक नागरिकांना आणि वाहनधारकांना दररोज तीव्र वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.मुख्य घडामोडी आणि नागरिकांचे आरोप:२४ तास रस्त्यावर कब्जा: या मुख्य रस्त्यावर मोठ्या क्रेन, खाजगी बसेस, आणि शालेय बसेस बेकायदेशीरपणे पार्क केल्या जात आहेत.फूटपाथ गायब: रस्त्याच्या कडेला अनधिकृत टपऱ्या आणि फूटपाथवर भाजी बाजार, वडापाव,




पाणीपुरी, लस्सी व फळ विक्रेत्यांनी स्वतःचा ताबा मिळवला आहे.पादचाऱ्यांची कोंडी: फूटपाथ पूर्णपणे व्यापल्यामुळे पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून थेट मुख्य रस्त्यावरून वाहनांच्या गर्दीतून वाट काढावी लागत आहे.प्रशासनाचे हेतुपरस्पर दुर्लक्ष: स्थानिक नागरिकांनी हिंजवडी वाहतूक पोलीस विभाग आणि हिंजवडी पोलीस स्टेशनकडे वारंवार लेखी व तोंडी तक्रारी केल्या आहेत. मात्र, तरीही पोलीस आणि महानगरपालिका अधिकारी या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.आर्थिक साटेलोट्याचा संशय: पोलीस आणि अतिक्रमण करणाऱ्यांमध्ये काही छुपे संबंध किंवा आर्थिक साटेलोटे आहे का, असा संतप्त सवाल आता स्थानिक रहिवाशांकडून विचारला जात आहे.या परिसरातून अतिक्रमण तातडीने हटवून रस्ता मोकळा करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# भोसरीत वडार समाजाचा संकल्प मेळावा उत्साहात

## बेरोजगारी, शिक्षण व आरोग्याच्या प्रश्नांवर एकजुटीची हाक; जानेवारी २०२७ मध्ये कोल्हापुरात महामेळावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

भोसरी : प्रतिनिधी

वडार समाजातील बेरोजगारी, आरोग्य, शिक्षण आणि विविध सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी समाजबांधवांनी एकजुटीने पुढे येण्याची गरज आहे, असे आवाहन 'मी पडहार महाराष्ट्र' संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विजय चौगुले यांनी केले.

भोसरी येथील क्वालिटी सर्कल फोरम सभागृहात वडार समाज संकल्प मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या वेळी चौगुले बोलत होते. मेळाव्यात वडार समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच आगामी जानेवारी २०२७ मध्ये कोल्हापूर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या वडार समाज महामेळाव्यास लाखो समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले.

**१९६१ च्या पुराव्याची अट शिथिल करण्याची मागणी**

वडार समाजातील नागरिकांना जातीचे दाखले मिळविताना येणाऱ्या अडचणींचा मुद्दा मेळाव्यात उपस्थित करण्यात आला. जातीचा दाखला मिळविण्यासाठी आवश्यक असलेली १९६१ सालच्या पुराव्याची अट शिथिल करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

**हक्काची पक्की घरे द्या**

वडार समाजातील अनेक कुटुंबांना अद्यापही निवारा आणि घरांच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याचे नमूद करण्यात आले. समाजातील गरजू कुटुंबांना हक्काची पक्की घरे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी मेळाव्यात करण्यात आली.

**संशोधन संस्थेची स्थापना करण्याचा ठराव**

समाजाचा इतिहास, परंपरा, संस्कृती आणि सामाजिक प्रश्नांवर संशोधन करण्यासाठी 'शूरवीर हरबार वडार रिसर्च अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट' स्थापन करण्यात यावी, असा ठराव मांडण्यात आला.

**बेरोजगार तरुणांना विनाअट कर्ज द्या**

वडार समाजातील बेरोजगार युवकांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विनाअट कर्जपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने विशेष धोरण आखावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

**प्रशासकीय सेवेत समाजाचा सहभाग वाढविण्याचे आवाहन**

समाजातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन प्रशासकीय सेवेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. त्यासाठी समाजाने विद्यार्थ्यांना आर्थिक, शैक्षणिक आणि मानसिकदृष्ट्या भक्कम पाठबळ द्यावे, असे आवाहनही मेळाव्यात करण्यात आले.

# गणेशोत्सवापूर्वी महापालिका प्रशासन 'अलर्ट'; रस्ते, स्वच्छता अन् विद्युत सुरक्षेला प्राधान्य

## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा विभागप्रमुखांना स्पष्ट आदेश; अतिक्रमण-अनधिकृत बांधकामांवर तातडीने कारवाईच्या सूचना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरातील नागरी व्यवस्था सुरळीत आणि सुरक्षित ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनाने कंबर कसली आहे. रस्ते, पदपथ, स्वच्छता, विद्युत सुरक्षा तसेच गणेशमूर्ती विसर्जन व्यवस्था यांना प्राधान्य देण्याच्या सूचना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी विभागप्रमुख व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिल्या.

पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात झालेल्या आढावा बैठकीत शहरातील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, रस्ते व पदपथांची दुरवस्था, स्वच्छता, विद्युत जोडण्या, उद्याने, कृत्रिम विसर्जन हौद आणि नागरिकांच्या तक्रारी यांचा आयुक्तांनी आढावा घेतला.

गणेशमूर्ती विसर्जनासाठी उभारण्यात येणाऱ्या कृत्रिम हौदांची तयारी वेळेत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विसर्जनस्थळी स्वच्छता, पुरेशी प्रकाशयोजना, सुरक्षा व्यवस्था आणि नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. गणेशोत्सव काळात विविध विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

शहरातील विद्युत तारा आणि जोडण्यांची तपासणी करून धोकादायक किंवा अनधिकृत जोडण्यांवर संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने तातडीने कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच रस्ते खड्डेमुक्त करण्याची कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश आहेत. 'फुटपाथ पादचाऱ्यांसाठी, अतिक्रमणधारकांसाठी नव्हे!' अशी स्पष्ट भूमिका घेत क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी आपल्या प्रभागातील पदपथ मोकळे करून देण्याचे आदेश आयुक्तांनी दिले. सार्वजनिक स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता, झाडांची छाटणी आणि रस्त्यांची देखभाल यावरही भर देण्यात आला.

अनधिकृत बांधकामांवर बीट निरीक्षकांनी बारकाईने लक्ष ठेवावे आणि नव्याने सुरू होणाऱ्या बांधकामांची माहिती तातडीने संबंधित विभागाला द्यावी, असे आदेश देण्यात आले. अशा बांधकामांवरील नळजोडणी आणि विद्युत पुरवठा खंडित करण्याबाबतही नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

दरम्यान, नागरिकांनी सदनिका किंवा मालमत्ता खरेदी करण्यापूर्वी बांधकाम अधिकृत आहे की नाही, मंजूर आराखडा व आवश्यक परवानग्या तपासाव्यात, याबाबत जनजागृती करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले.

महापालिकेच्या सारथी प्रणालीवर तसेच शासनाच्या संकेतस्थळांवर प्राप्त तक्रारींचा तातडीने निपटारा करण्याचे आदेश देतानाच लोकप्रतिनिधींची पत्रे, निवेदने आणि तक्रारी यांवरही वेळेत कार्यवाही करून त्यांना अहवाल देण्यास सांगण्यात आले.

शहरातील नागरिकांसाठी वाचनालये, ग्रंथालये आणि व्यायामशाळांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने क्षेत्रीय कार्यालयनिहाय उपलब्ध जागांचा आढावा घेऊन नियोजन करण्याच्या सूचनाही आयुक्तांनी दिल्या.

बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, तृप्ती सांडभोर, शहर अभियंता मनोज सेठिया यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# मावळात जुन्या भांडणातून तरुणाची कोयत्याने वार करून निर्घृण हत्या; ६ आरोपींना अटक, २ अल्पवयीन ताब्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वराळे (ता. मावळ) येथे जुन्या वैमनस्यातून एका तरुणाची कोयत्याने सपासप वार करून तसेच डोक्यात दगड घालून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तत्परता दाखवत ६ आरोपींना बेड्या ठोकल्या असून दोन विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेतले आहे.

**चहा पिण्यासाठी थांबलेल्या तरुणावर हल्ला**

मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांत सुभाष शिंगाडे हा तरुण रविवारी (३० ऑगस्ट) रात्री दीड वाजण्याच्या सुमारास शिक्षक कॉलनी, वराळे येथील एस.डी. फोटो स्टुडिओजवळ मित्रांसोबत चहा पिण्यासाठी थांबला होता. त्यावेळी जुन्या भांडणाचा राग मनात धरून आलेल्या टोळक्याने सार्वजनिक ठिकाणी दहशत माजवली. आरोपींनी प्रशांतवर धारदार कोयत्याने डोक्यात, हातावर, छातीवर आणि पाठीवर सपासप वार केले. त्यानंतर त्याच्या डोक्यात मोठा दगड घालून त्याचा जागीच खून केला.

या प्रकरणी मयत तरुणाचे वडील सुभाष विष्णू शिंगाडे (वय ५०, रा. समता कॉलनी, वराळे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) आणि आर्म्स ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ताब्यात घेण्यात आलेले आरोपी: १. साहिल पांडुरंग समुखराव (वय १८ वर्षे ९ महिने) २. सुनील पांडुरंग समुखराव (वय २४ वर्षे)

३. यश दीपक लोखंडे (वय १९ वर्षे ५ महिने)

४. रोहन हनुमंत सावंत (वय १९ वर्षे ६ महिने)

५. हेमराज गौतम सोनवणे (वय २८ वर्षे)

६. रोशन साव (वय २१ वर्षे, सर्व रा. समता कॉलनी, वराळे)

यांच्यासह दोन अल्पवयीन मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पुढील तपास सपोनि मोहिते करत आहेत.

**चाकणमध्ये हातचलाखीने ज्येष्ठ नागरिकाचे दीड लाखांचे दागिने लंपास**

चाकण येथे पुणे-नाशिक रस्त्यावरील वॉशिंग सेंटरजवळ गोविंद धर्मराज दर्वेश्वर (वय ७९) या ज्येष्ठ नागरिकाला अनोळखी इसमाने गाठले. 'वडिलांना व्हिडिओ कॉलवर डिझाईन दाखवून आम्हालाही अशीच सोनसाखळी व अंगठी बनवायची आहे' असे सांगून विश्वास संपादन केला. त्यानंतर हातचलाखीने गळ्यातील सोन्याची चेन व हातातील अंगठी असा एकूण १,५०,००० रुपयांचा मुद्देमाल घेऊन आरोपी पसार झाला. चाकण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून पोहवा जाधव तपास करत आहेत.

**दक्षिण महाळुंगे हद्दीत टेम्पो अडवून चालकाला मारहाण**

मोई गावच्या हद्दीत भैरवनाथ मंदिराजवळ सुप्रीमो गाडीतून माल उतरवून जात असताना सुरज गोपाळ तोरे (वय २३, रा. चिखली) या चालकाला तीन अज्ञात इसमांनी गाडी अडवून शिवीगाळ करत मारहाण केली. या प्रकरणी दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**निगडीत पीएमपीएमएल बसच्या धडकेत ज्येष्ठ नागरिक गंभीर जखमी**

घटना: निगडी येथील पवळे ब्रिजखाली आदित्य ट्रॅव्हलर्स तिकीट काउंटरजवळ भरधाव लाल रंगाच्या पीएमपीएमएल (झचझचङ) बसने रस्ता ओलांडणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाला जोरदार धडक दिली.

तपशील: या अपघातात नंदकुमार श्रीरंग शिवशरण (वय ५८ वर्षे) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्या डोक्याला आणि हनुवटीला मोठी दुखापत झाली आहे. धडक दिल्यानंतर बसचालक कोणतीही वैद्यकीय मदत न करता घटनास्थळावरून पसार झाला.

कारवाई: जखमींचे सुपुत्र प्रणव नंदकुमार शिवशरण (रा. चिखली) यांच्या फिर्यादीवरून निगडी पोलीस ठाण्यात अज्ञात बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार कोळी करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### प्रेम प्रकरणातून अभियंता तरुणीला मारहाण; तरुणीने उचलले टोकाचे पाऊल, प्रियकर तरुणाला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

प्रियकरासोबत झालेल्या वादातून संगणक अभियंता तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना खराडी भागात घडली. या प्रकरणी प्रियकराविरोधात खराडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. जान्हवी राजेशकुमार पाठक (वय २३, सध्या रा. खराडी, मूळ रा. बिहार) असे गळफास घेतलेल्या तरुणीचे नाव असून, अमृतकुमार अरुणकुमार सिंह (वय २३) असे आरोपी प्रियकराचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आत्महत्या केलेली २३ वर्षीय तरुणी ही मूळ बिहारमधील पाटणा शहरातील रहिवासी आहे. आरोपी हा मूळचा बिहारचा आहे. तरुणी आणि आरोपीने एकत्र शालेय शिक्षण घेतले होते. तरुणीने राजस्थानातून संगणक अभियांत्रिकी अभ्यासक्रम पूर्ण केला. आरोपी हा नोएडा येथील एका आयटी कंपनीत कामाला आहे. तरुणी दोन महिन्यांपासून खराडीतील आयटी कंपनीत काम करत होती. खराडीतील एका सोसायटीत तिने भाडेतत्त्वावर फ्लॅट घेतला होता. भाडेकरार केल्यानंतर ती सोमवारपासून तेथे राहायला जाणार होती. दोन दिवसांपूर्वी आरोपी तरुणीला भेटण्यासाठी नोएडाहून शहरात आला होता. गुरुवारी रात्री दोघांमध्ये वाद झाला.

वादातून आरोपीने तरुणीला मारहाण केली. त्यानंतर तरुणीने मध्यरात्री गळफास घेऊन आत्महत्या केली. तरुणीच्या काकांनी याबाबत पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक मोरे पुढील तपास करत आहेत.

# धामणीत श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त भक्तीबरोबरच सामाजिक सेवेचा जागर

## अखंड हरिनाम सप्ताहाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त १०१ रक्तदात्यांचे रक्तदान; महाआरोग्य शिबिरालाही उत्स्फूर्त प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

धामणी (ता. आंबेगाव) : श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त धामणी येथे भक्ती, अध्यात्म आणि सामाजिक बांधिलकीचा अनोखा संगम पाहायला मिळाला. शताब्दी महोत्सवाचे औचित्य साधून आयोजित रक्तदान शिबिरात तब्बल १०१ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. त्याचबरोबर आयोजित महाआरोग्य शिबिरालाही ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पुना ब्लड सेंटर, नारायणगाव यांच्या सौजन्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' या भावनेतून तरुणांसह ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. धार्मिक उत्सवाला सामाजिक उपक्रमाची जोड देत रक्तदानाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदतीचा हात देण्याचा आदर्श धामणी ग्रामस्थांनी निर्माण केला.



यावेळी रक्तदान करणाऱ्या युवकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. रक्तदानासाठी तरुणांनी दाखविलेला उत्साह विशेष लक्षवेधी ठरला.

दरम्यान, जय हिंद प्रतिष्ठान, धामणी, पुना डायग्नोस्टिक सेंटर आणि न्यू लाईफ वेलनेस सेंटर, पुणे यांच्या सौजन्याने भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या तसेच ग्रामस्थांना तज्ज्ञांकडून वैद्यकीय मार्गदर्शन देण्यात आले. अनेक ग्रामस्थांनी या शिबिराचा लाभ घेतला.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त धार्मिक कार्यक्रमांसोबत समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. 'भक्तीची परंपरा आणि सेवाभावाची संस्कृती' यांचा सुंदर मिलाफ या उपक्रमातून अनुभवायला मिळाला.

श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव केवळ धार्मिक सोहळा न राहता मानवसेवेचा संदेश देणारा सामाजिक उत्सव ठरला. १०१ रक्तदात्यांनी केलेले रक्तदान आणि महाआरोग्य शिबिराला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा धामणीच्या सामाजिक एकजुटीचा आणि सेवाभावी संस्कृतीचा प्रेरणादायी नमुना ठरला.

# एमआयडीसीला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध; 'जमिनी देणार नाही'चा निर्धार!

## खैरेनगर ग्रामसभेत शासनाविरोधात संताप; मोजणीसाठी आलेल्या कर्मचाऱ्यांना ग्रामस्थांनी परत पाठविले:आंदोलन, रास्तारोको, उपोषणाचा इशारा; महिला, युवक-युवतींसह ग्रामस्थ आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

खेरेनगर, धामारी आणि पाबळ परिसरात प्रस्तावित पाबळ एमआयडीसीला स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. 'आमच्या जमिनी आमच्या जगण्याचा आधार आहेत. त्या कोणत्याही परिस्थितीत देणार नाही,' असा निर्धार व्यक्त करत ग्रामस्थांनी शासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. जमीन संपादनासाठी जबरदस्तीचा प्रयत्न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला.

खैरेनगर (ता. शिरूर) येथे सोमवार (दि. ३१) रोजी झालेल्या ग्रामसभेत पाबळ एमआयडीसीच्या प्रस्तावाला तीव्र विरोध करण्यात आला. शेती हीच अनेक कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रमुख आधार असल्याने जमीन एमआयडीसीसाठी संपादित झाल्यास शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

दरम्यान, जमीन मोजणीसाठी शासनाचे कर्मचारी गावात आले असता ग्रामस्थांनी मोजणीला स्पष्ट विरोध केला. ग्रामस्थांनी मोजणी होऊ दिली नाही आणि संबंधित कर्मचाऱ्यांना परत पाठविले. त्यामुळे एमआयडीसीच्या मुद्द्यावरून प्रशासन आणि ग्रामस्थांमधील संघर्ष तीव्र होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

'जमिनी गेल्यानंतर आम्ही काय करायचे? आमच्या उपजीविकेचे साधनच हिरावून घेतले जाणार असेल, तर आम्ही जमिनी देणार नाही. शासनाने प्रथम स्थानिक शेतकऱ्यांची भूमिका समजून घ्यावी आणि त्यानंतरच कोणताही निर्णय घ्यावा,' अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली.

एमआयडीसीला विरोध करताना आगामी काळात आंदोलन, रास्तारोको, उपोषण आणि इतर लोकशाही मार्गांचा अवलंब करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. शासनाने जबरदस्तीने जमीन मोजणी अथवा संपादनाचा प्रयत्न केल्यास संघर्ष अधिक तीव्र होईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

माजी सरपंच कुंडलीक खैरे, संदिप खैरे, एकनाथ खैरे, माऊली खैरे, माजी उपसरपंच पाटीलबुवा खैरे, गणपत खैरे, वसंत खैरे, हरिचंद्र खैरे, सत्यवान खैरे आणि कारभारी खैरे यांच्यासह ग्रामस्थांनी या भूमिकेला पाठिंबा दिला.

ग्रामसभेला महिला ग्रामस्थ, युवक-युवती आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे पाबळ एमआयडीसीच्या मुद्द्यावर ग्रामस्थांमध्ये असलेला असंतोष स्पष्टपणे समोर आला आहे. आता शासन प्रशासन या विरोधाची दखल घेऊन ग्रामस्थांशी चर्चा करणार की जमीन संपादनाच्या प्रक्रियेला पुढे नेणार, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

'शेती वाचवा, जमीन वाचवा' या भूमिकेवर ग्रामस्थ ठाम असून, एमआयडीसीविरोधातील संघर्ष आगामी काळात आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

# जय हनुमान ज्येष्ठ नागरिक संघाची १६ वी वार्षिक सभा उत्साहात संपन्न

## विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांचा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; 'भक्त पुंडलिक' व 'श्रावण बाळ' पुरस्काराचे वितरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील जय हनुमान ज्येष्ठ नागरिक संघाची १६ वी वार्षिक सभा विठ्ठल मंदिरात उत्साहपूर्ण वातावरणात नुकतीच संपन्न झाली. सभेत संघाच्या वर्षभरातील विविध सामाजिक, विधायक आणि समाजोपयोगी उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. तसेच आगामी वर्षात ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत चर्चा करून त्यादृष्टीने नियोजन करण्यात आले.



सभेदरम्यान ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या, आरोग्यविषयक उपक्रम, सामाजिक सहभाग तसेच संघाच्या पुढील वाटचालीबाबत सदस्यांनी आपली मते व्यक्त केली. ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य, सामाजिक सन्मान आणि सक्रिय सहभाग यासाठी संघाच्या माध्यमातून सातत्याने विधायक उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा तसेच स्पर्धा परीक्षेतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संघाच्या वतीने देण्यात येणारा 'भक्त पुंडलिक पुरस्कार' माजी प्राचार्य उत्तम आवारी यांना, तर 'श्रावण बाळ पुरस्कार' प्रकाश दामू टाव्हरे यांना प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमास संघाचे ज्येष्ठ सल्लागार प्रतापराव वळसे पाटील, माजी सरपंच फकिरा वळसे पाटील, उद्योजक नामदेव थोरात, सरपंच रवि वळसे पाटील, कार्याध्यक्ष दिगांबर सुडके, दत्तात्रय टाव्हरे, माजी प्राचार्य पी. आर. हिंगे, हरिभाऊ वळसे पाटील, पंढरीनाथ तापकीर, विठ्ठल गवारी, सुरेश टाव्हरे, प्राचार्य कांताराम टाव्हरे, सुनील वळसे पाटील, प्रा. अरुण गोरडे, रत्नाकर कोर्हाळे, प्रसिद्ध निवेदिका मनीषा वळसे पाटील आणि सुनीता जाधव यांच्यासह संघाचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघाचे अध्यक्ष बाजीराव वळसे पाटील यांनी केले. सचिव डॉ. विलास वळसे पाटील यांनी संघाचा वार्षिक अहवाल सादर केला. उत्तम आवारी यांनी सूत्रसंचालन केले, तर दामोदर ढवळे यांनी आभार मानले.

वार्षिक सभेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल उपस्थितांनी संघाच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. ज्येष्ठ नागरिकांच्या अनुभव, ज्ञान आणि सामाजिक योगदानाला व्यासपीठ देण्याबरोबरच नव्या पिढीला सामाजिक बांधिलकीची प्रेरणा देणारा हा कार्यक्रम ठरला.

# लेण्याद्रीत संकष्टी चतुर्थीला भक्तांचा महापूर

## 'श्री गिरिजात्मज'च्या दर्शनासाठी हजारो भाविकांची गर्दी; मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

जुन्नर : प्रतिनिधी

अष्टविनायक तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथे संकष्टी चतुर्थी आणि श्रावणी सोमवारच्या पर्वणीचा भक्तिमय संगम पाहायला मिळाला. 'श्री गिरिजात्मज' गणपतीच्या दर्शनासाठी पुणे, अहमदनगर, मुंबई, ठाणे, नाशिक तसेच जुन्नर परिसरातून हजारो भाविकांनी गर्दी केली. दिवसभर भाविक आणि पर्यटकांची मोठी वर्दळ राहिल्याने संपूर्ण लेण्याद्री परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

संकष्टी चतुर्थीनिमित्त श्री गिरिजात्मज गणपतीच्या मूर्तीला तसेच मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. सकाळी ६.१५ वाजता देवस्थानचे विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापूजा करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी श्रींच्या दर्शनाचा लाभ घेतला. मंदिरात सकाळी ७, दुपारी १२ आणि सायंकाळी ७ वाजता महाआरती करण्यात आली.

देवाच्या नैवेद्यासाठी मंचर येथील बाळासाहेब बापू थोरात यांनी तीन कॅरेट केळी प्रसाद म्हणून अर्पण केली. संकष्टी चतुर्थीनिमित्त देवस्थानच्या वतीने दिवसभर विविध धार्मिक विधी पार पडले. भाविकांना दर्शन सुलभ व्हावे यासाठी देवस्थान ट्रस्टने गर्दीचे नियोजन केले होते. तसेच भाविकांसाठी आवश्यक विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

सायंकाळी श्री मुक्ताई प्रासादिक भजनी मंडळ, शिवेचीवाडी यांच्या वतीने संगीत भजनाचा कार्यक्रम झाला. रात्री चंद्रोदयाच्या वेळी श्रींची विशेष महाआरती करण्यात आली. त्यानंतर गोळेगाव येथील जय महाराष्ट्र ग्रुप आणि राजगुरुनगर येथील संकेत बजरंग मुंढे यांच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

दिवसभर विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्री गिरिजात्मज गणपतीचे दर्शन घेतले. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन दर्शन व्यवस्था शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आली होती.

यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त मच्छिंद्र शेटे, सदाशिव ताम्हाणे, काशिनाथ लोखंडे, जयवंत डोके, कार्यालयीन सचिव रोहीदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने, कर्मचारी, ग्रामस्थ तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे व सेक्रेटरी शंकर ताम्हाणे यांनी संकष्टी चतुर्थीनिमित्त लेण्याद्री येथे हजारो भाविकांनी उपस्थित राहून श्री गिरिजात्मजाचे दर्शन घेतल्याची माहिती दिली.

# हडपसरमध्ये आरोग्य-रोजीरोटीसाठी 'हल्लाबोल'

## १०० बेडच्या सुसज्ज सरकारी रुग्णालयाची प्रमुख मागणी; भाजी मंडईसाठीही आंदोलन, प्रशासनाला उपोषणाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

हडपसर परिसरातील नागरिकांच्या आरोग्य आणि रोजीरोटीच्या प्रश्नांवरून स्थानिक पातळीवरील आंदोलनाची धार तीव्र झाली आहे. गरजू नागरिकांना परवडणाऱ्या दरात उपचार मिळावेत, यासाठी हडपसरमध्ये तातडीने १०० बेडचे सुसज्ज सरकारी रुग्णालय उभारावे, या प्रमुख मागणीसाठी हडपसर क्षेत्रीय कार्यालयावर 'हल्लाबोल' मोर्चा काढण्यात आला.

हडपसर परिसरात एखाद्या नागरिकाला हृदयविकाराचा झटका किंवा अन्य गंभीर आजाराची समस्या उद्भवल्यास उपचारासाठी मोठ्या खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतो. काही नामांकित खासगी रुग्णालयांकडून उपचार सुरू करण्यापूर्वी ५० हजार ते एक लाख रुपयांपर्यंत आगाऊ रक्कम मागितली जात असल्याचा दावा आंदोलकांनी केला. सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना हा खर्च परवडत नसल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवत असल्याचे आंदोलकांनी सांगितले.

हडपसरला हक्काचे सरकारी रुग्णालय द्या

हडपसरमध्ये गरिबांसाठी सर्व आवश्यक सुविधांनी सुसज्ज १०० बेडचे सरकारी रुग्णालय तातडीने उभारावे, अशी प्रमुख मागणी मोर्चाद्वारे करण्यात आली. गंभीर रुग्णांना उपचारासाठी दूरवर धावपळ करावी लागू नये आणि परिसरातील नागरिकांना स्थानिक पातळीवरच दर्जेदार व परवडणाऱ्या आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी हे रुग्णालय आवश्यक असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले.

रोजीरोटीचा प्रश्नही ऐरणीवर

आरोग्याच्या प्रश्नाबरोबरच नागरिकांच्या रोजीरोटीशी संबंधित हक्काची भाजी मंडई उभारण्याची मागणीही मोर्चात करण्यात आली. स्थानिक नागरिक आणि छोट्या व्यावसायिकांच्या उपजीविकेचा प्रश्न प्रशासनाने तातडीने सोडवावा, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलकांनी प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. २५ दिवस झाले घरातली चूल पेटलेली नाही, घर कसं चालवायचं? असा संतप्त सवाल करत नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे प्रशासन आणि सरकार कधी गांभीर्याने पाहणार, असा सवाल करण्यात आला.

मागण्या मान्य न झाल्यास उपोषणाचा इशारा

हडपसर परिसरातील आरोग्य, रोजगार आणि रोजीरोटीशी संबंधित मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. मागण्यांची दखल घेऊन ठोस कार्यवाही न झाल्यास तीव्र उपोषणाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी प्रशासनाला देण्यात आला.

आरोग्य सुविधा आणि नागरिकांच्या उपजीविकेचे प्रश्न केवळ आश्वासनांवर न ठेवता त्यावर ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी करत मोर्चेकऱ्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.

# दारूसाठी पैसे न दिल्याने मुलानेच केली आईची हत्या; येरवड्यातील धक्कादायक घटना

■ पुणे : प्रतिनिधी

दारू पिण्यासाठी पैसे दिले नाहीत या रागातून पोटच्या मुलानेच आपल्या ५० वर्षीय आईवर सुरीने प्राणघातक वार करून तिची निर्घृण हत्या केली. ही धक्कादायक घटना येरवड्यातील शांतीनगर भागात घडली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सविता सुरेश हरिभक्त (वय ५०, रा. शांतीनगर, येरवडा) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी त्यांचे पती सुरेश रामचंद्र हरिभक्त (वय ५७, व्यवसाय- वॉचमन) यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. त्यावरून त्यांचा मुलगा आरोपी सागर उर्फ अनिकेत सुरेश हरिभक्त (वय ३२, रा. शांतीनगर, येरवडा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शनिवारी (दि. २९) २०२६ रोजी रात्री सुमारे ९:३० वाजण्याच्या सुमारास शांतीनगर येथील तक्रारदारांच्या राहत्या घरी घडली. आरोपी सागर याने त्याची आई सविता हिच्याकडे दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली होती. मात्र, आईने पैसे देण्यास नकार दिल्याने संतापलेल्या सागरने तिच्याशी जोरात भांडण उकरून काढले. भांडणाचा राग अनावर झाल्याने आरोपीने घरातील सुरीने आईच्या गळ्यावर सपासप वार करून तिला गंभीर जखमी केले. या प्राणघातक हल्ल्यात सविता यांचा जागीच मृत्यू झाला. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची घटनास्थळी भेट घटनेची माहिती मिळताच विश्रांतवाडी व येरवडा विभागातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यामध्ये पोलिस उपायुक्त परिमंडळ ४ चुलुमुला रजनिकांत, सहायक पोलिस आयुक्त (खडकी/येरवडा विभाग) ब्रह्मदेव गावडे, विश्रांतवाडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) संपतराव राऊत, पोलिस निरीक्षक (गुन्हे) अमर कदम आणि पोलिस उपनिरीक्षक सचिन राऊत यांनी घटनास्थळाची पाहणी केली. तसेच तपासासाठी फॉरेन्सिक व्हॅनलाही पाचारण करण्यात आले आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०३(१) आणि महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलमान्वये विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सारांश वृत्त

## पत्रकारांनी सत्याची बाजू घ्यावी; कोणाच्याही दबावाला घाबरू नका : खासदार प्रणिती शिंदे

■ दैनिक राज्य लोकतंत्र
सोलापूर : प्रतिनिधी

सोलापूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी सी ब्लॉकच्या वतीने जागतिक छायाचित्र दिनानिमित्त पत्रकार आणि छायाचित्रकारांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी सोलापूरच्या पहिल्या महिला खासदार मा. प्रणिती शिंदे यांच्या शुभहस्ते पत्रकार व छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात आला.

रक्षाबंधनाचा दिवस असल्याने प्रणिती शिंदे यांनी उपस्थित पत्रकार आणि छायाचित्रकारांना स्वतः राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. त्यानंतर पत्रकार व छायाचित्रकारांना शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्रणिती शिंदे यांनी पत्रकार आणि छायाचित्रकारांशी मनमोकळेपणाने संवाद साधला. कार्यक्रमात बोलताना खासदार प्रणिती शिंदे यांनी पत्रकारांना सत्याची बाजू घेण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या, पत्रकारांनी कोणालाही घाबरू नये. रक्षाबंधनाच्या निमित्ताने पत्रकारांना राखी बांधून त्यांचा सन्मान केल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. उपस्थित पत्रकार, छायाचित्रकार आणि कार्यकर्त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, संदीप वाडेकर, केवल तिवारी, आप्पा बनसोडे, अयुब कागदी, सोनू शहानुरकर, कृष्णकांत चव्हाण, रामदास काटकर, संतोष कासे, आदित्य केंगार, यशवंत गुरव, इराण्णा जुजगार, विक्रम कालेकर, प्रमोद हिपरगी, नितीन कटके, आशिष भुदत्त, सागर इप्पलपल्ली, दिनेश शिंदे, तौसिफ शेख, लोकशाही न्यूज २४ चे संपादक वसीमराजा बागवान , विजय कालेकर, लक्ष्मीकांत शिंदे, चंदू सोगळे, भीमाशंकर टेकाळे, कुणाल गायकवाड, प्रमिला तुपलवंडे, तिरुपती परकीपंडला, सागर उबाळे, शिवशंकर अंजनाळकर, संजय गायकवाड, प्रतीक जाधव, सुभाष वाघमारे, व्यंकटेश बोम्मन, राजू निलगंटी, गोपी गायकवाड, अभिषेक अच्युगटला, सुनील डोळसे यांच्यासह इतर फोटोग्राफर, व्हिडिओग्राफर व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘नकली चीज-पनीर’ला झोमॅटोचा थेट धक्का! रेस्टॉरंट्सना शून्य-सहिष्णुता धोरण; नियम मोडणाऱ्यांना व्यासपीठावरून हटवणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली/ वृत्तसंस्था

ऑनलाइन खाद्यपदार्थ मागवणाऱ्या ग्राहकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. झोमॅटोने आपल्या व्यासपीठावर ‘अनुरूप दुग्धजन्य पदार्थां’पासून बनवलेल्या खाद्यपदार्थांविरोधात शून्य-सहिष्णुता धोरण जाहीर केले आहे. सोमवारपासून ज्या रेस्टॉरंट भागीदारांनी त्यांच्या खाद्यपदार्थांमध्ये ‘अनुरूप दुग्धजन्य पदार्थ’ वापरत असल्याचे स्वतः घोषित केले आहे, असे पदार्थ झोमॅटोच्या व्यासपीठावरून तत्काळ हटवण्यात आले आहेत.

‘अनुरूप पदार्थ’ म्हणजे दिसायला आणि चवीला पारंपरिक खाद्यपदार्थांसारखे भासणारे, मात्र त्यामध्ये मूळ घटकांऐवजी स्वस्त किंवा पर्यायी घटकांचा वापर केलेले पदार्थ. उदाहरणार्थ, खऱ्या दुधातील चरबी किंवा चीजऐवजी वनस्पतीजन्य तेलांचा वापर करून चीजसारखा पदार्थ तयार केला जाऊ शकतो. ग्राहकाला पदार्थ नेहमीच्या चीज किंवा पनीरसारखा दिसतो; मात्र त्यातील मूळ दुग्धजन्य घटक वेगळे असू शकतात.




झोमॅटोने स्पष्ट केले आहे की, आपल्या व्यासपीठावर अशा पदार्थांच्या विक्रीला अजिबात सहन केले जाणार नाही. नियमांचे पालन न करणाऱ्या रेस्टॉरंट भागीदारांना व्यासपीठावरून हटवण्याचा अधिकार कंपनीने राखून ठेवला आहे. म्हणजेच ग्राहकांच्या आरोग्याशी, माहितीच्या अधिकाराशी आणि खाद्यपदार्थांच्या अचूक वर्णनाशी संबंधित नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या आस्थापनांवर थेट कारवाई होऊ शकते.

या निर्णयामुळे ऑनलाइन खाद्यविक्री क्षेत्रात ‘स्वस्त पर्याय दाखवून पारंपरिक पदार्थांच्या नावाने विक्री’ करण्याच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. ग्राहकाने पनीर, चीज किंवा अन्य दुग्धजन्य पदार्थ मागवला, तर त्याला प्रत्यक्षात कोणता घटक दिला जात आहे, याची स्पष्ट माहिती मिळणे महत्त्वाचे आहे.

मात्र या निर्णयाची अंमलबजावणी किती कठोरपणे केली जाते, रेस्टॉरंट्सकडून घटकांची माहिती कशी पडताळली जाते आणि नियम मोडणाऱ्यांवर नेमकी कोणती कारवाई केली जाते, हेही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे.

## अन्नमहागाई वाढली तर घरखर्चाचा कोंडमारा! सरकारचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर महागाईचे नवे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे. अन्नधान्याच्या किमती वाढल्या तर घरगुती उत्पन्नाचा मोठा हिस्सा केवळ अन्नावर खर्च होईल आणि कपडे, इलेक्ट्रॉनिक्स, वाहनांसह इतर गरजेच्या वस्तूंवरील खर्चाला कात्री लागू शकते, असा स्पष्ट इशारा केंद्र सरकारने आपल्या मासिक आर्थिक अहवालातून दिला आहे.

सरकारच्या मते, देशातील अन्नमहागाई आणि कृषी उत्पादनाचा आगामी अंदाज सध्या अनिश्चित आहे. त्यामागे सर्वात मोठे कारण म्हणजे ‘एल निनो’चा वाढता प्रभाव. हा प्रभाव २०२६च्या अखेरीस सर्वाधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हवामानातील बदलांचा थेट परिणाम पाऊस, शेती उत्पादन आणि त्यातून बाजारातील अन्नधान्याच्या पुरवठ्यावर होऊ शकतो. त्यामुळे आधीच महागाईच्या चटक्याला सामोरे जाणाऱ्या सामान्य कुटुंबांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

महत्त्वाचे म्हणजे, महागाई केवळ स्वयंपाकघरापुरती मर्यादित राहत नाही. भाजीपाला, धान्य, डाळी, तेल आणि इतर अन्नपदार्थ महागले की उपलब्ध उत्पन्नाचा मोठा भाग अन्नासाठी खर्च होतो. परिणामी बिगर-अन्न वस्तू आणि सेवांवरील ग्राहक खर्च कमी होतो. याचा थेट परिणाम बाजारपेठेतील मागणीवर आणि आर्थिक वाढीवर होऊ शकतो.

जागतिक अर्थव्यवस्थेतील अनिश्चितता कायम असतानाही भारतातील आर्थिक हालचाली, महागाई आणि परकीय क्षेत्राची स्थिती तुलनेने स्थिर असल्याचे सरकारने म्हटले आहे. देशांतर्गत मागणी अजूनही अर्थव्यवस्थेला आधार देत आहे; मात्र आर्थिक विस्ताराचा वेग काहीसा मंदावल्याचेही अहवालातून स्पष्ट होते. दरम्यान, जागतिक सरकारी रोखे बाजारातील हालचालींवर भारत सरकार लक्ष ठेवून आहे. भारतीय रोख्यांच्या परताव्यात वाढ झाली किंवा मोठी घसरण झाली, तरी त्यातून अर्थव्यवस्थेसाठी धोके निर्माण होऊ शकतात, असा इशाराही देण्यात आला आहे.

## पाण्यावरही आंतरराष्ट्रीय आदेशाचा ठोसा! भारताने पाकिस्तानसोबतचा जलकरार पाळावा; काश्मीरमधील जलविद्युत प्रकल्पावरही मर्यादा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी ।

भारत-पाकिस्तानमधील तणाव आता केवळ सीमा आणि सुरक्षेपुरता राहिलेला नसून पाण्याच्या हक्कावरही आंतरराष्ट्रीय पातळीवर संघर्ष तीव्र झाला आहे. हेग येथील कायमस्वरूपी लवाद न्यायालयाने सोमवारी भारताने पाकिस्तानसोबतचा जलवाटप करार कायम ठेवावा आणि काश्मीरमध्ये सुरू असलेल्या जलविद्युत प्रकल्पाच्या कामावर करारातील मर्यादा पाळाव्यात, असे म्हटले आहे. त्यामुळे भारताच्या पाकिस्तानविषयक धोरणासमोर आणखी एक महत्त्वाचा आंतरराष्ट्रीय कायदेशीर प्रश्न उभा राहिला आहे.

हा वाद सिंधू जल कराराशी संबंधित आहे. या करारामुळे पाकिस्तानच्या शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचा मोठा भाग सुरक्षित राहतो. वृत्तसंस्थेच्या माहितीनुसार, पाकिस्तानमधील सुमारे ८० टक्के शेती या जलपुरवठ्यावर अवलंबून आहे. मात्र एप्रिल २०२५ मध्ये काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाल्यानंतर भारताने पाकिस्तानवर आरोप करत हा करार स्थगित केला.

भारताचा स्पष्ट युक्तिवाद असा आहे की, दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या देशासोबत नेहमीच्या पद्धतीने सहकार्य कसे चालू ठेवायचे? सुरक्षा आणि राष्ट्रीय हिताच्या प्रश्नावर भारताने कठोर भूमिका घेतली. मात्र आता हेगमधील लवादाच्या भूमिकेमुळे पाणी हे भारताच्या दहशतवादविरोधी धोरणातील दबावाचे साधन बनू शकते का, हा मूलभूत प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

विशेषतः काश्मीरमधील जलविद्युत प्रकल्पांबाबत हा निर्णय महत्त्वाचा आहे. भारताच्या दृष्टीने हिमालयीन नद्यांच्या पाण्याचा उपयोग ऊर्जा निर्मिती आणि विकासासाठी करणे हा सार्वभौम हक्काचा भाग आहे. दुसरीकडे पाकिस्तानला नदीच्या प्रवाहावर परिणाम होण्याची भीती आहे.

मात्र या निर्णयाचा सर्वात मोठा राजकीय संदेश वेगळाच आहेदहशतवादाच्या प्रश्नावर भारत-पाकिस्तान संबंध तुटले तरी पाण्याचा करार स्वतंत्र कायदेशीर चौकटीत पाहिला जाईल, असा आंतरराष्ट्रीय संकेत यातून मिळतो.

## फेडच्या व्याजदराच्या भीतीने सोन्याला मोठा धक्का! दोन आठवड्यांच्या नीचांकी पातळीवर घसरण; तरीही ऑगस्टमध्ये तब्बल ९.६% झेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

जागतिक बाजारात सोन्याच्या दराला सोमवारी मोठा फटका बसला. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर वाढवण्याची शक्यता वाढल्याने गुंतवणूकदारांनी सोन्यातील नफा वसूल करण्यास सुरुवात केली आणि सोन्याचा भाव जवळपास दोन आठवड्यांच्या नीचांकी पातळीवर पोहोचला. ठ्शीींशआँच्या माहितीनुसार, स्पॉट गोल्डमध्ये सुमारे ०.८ टक्क्यांची घसरण झाली आणि भाव ४,४१९.३८ डॉलर प्रति औंसपर्यंत आला. दिवसाच्या व्यवहारात सोन्याने १९ ऑगस्टनंतरची सर्वात कमी पातळी गाठली.

या घसरणीमागे सर्वात मोठे कारण म्हणजे अमेरिकेच्या व्याजदरांबाबत बदललेली बाजाराची भूमिका. फेडच्या आक्रमक भूमिकेचे संकेत मिळत असल्याने सप्टेंबरमध्ये व्याजदर वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी वाढवली आहे. बाजारातील दरवाढीची अपेक्षा आता ६४ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. त्यातच कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये झालेली वाढ महागाईचा दबाव आणखी वाढवू शकते, अशी चिंता आहे. महागाई नियंत्रणात



आणण्यासाठी फेडकडून कठोर धोरण कायम राहिल्यास सोन्यासारख्या व्याज उत्पन्न न देणाऱ्या मालमत्तेवर दबाव येऊ शकतो.

मात्र, सोन्याची ही घसरण म्हणजे त्याची संपूर्ण तेजी संपली असे मानणे घाईचे ठरेल. उलट, ऑगस्ट महिन्यात आतापर्यंत सोन्याच्या किमतीत तब्बल ९.६ टक्क्यांची वाढ झाली आहे. म्हणजेच आजची घसरण ही मोठ्या तेजीच्या पार्श्वभूमीवर झालेली नफा-वसुलीही असू शकते.

दरम्यान, चांदीही ऑगस्टमध्ये जानेवारीनंतरची सर्वात मोठी मासिक वाढ नोंदवण्याच्या मार्गावर आहे. प्लॅटिनम आणि पॅलेडियमसुद्धा यंदातील सर्वोत्तम महिन्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत.

आता बाजाराचे लक्ष अमेरिकेतील या आठवड्यात जाहीर होणाऱ्या रोजगाराच्या महत्त्वाच्या आकडेवारीकडे लागले आहे. कारण रोजगार बाजार मजबूत राहिला.

महागाईचा दबाव कायम राहिला आणि फेडने व्याजदर वाढवण्याचे संकेत दिले, तर सोन्यावर आणखी दबाव येऊ शकतो. मात्र आर्थिक स्थिती कमकुवत झाल्यास व्याजदर कपातीच्या अपेक्षा पुन्हा वाढू शकतात आणि त्याचा फायदा सोन्याला मिळू शकतो.

# संविधान दत्त कवच सुरक्षीत राहण्यासाठी चर्मकार पोटजातीनी संघटीत होऊन संघर्षासाठी सिद्ध व्हावे : माजी आमदार बाबुराव माने

■ दैनिक राज्य लोकतंत्र
सोलापूर : प्रतिनिधी

जाती जातीत, धर्मा धर्मात फुट पाडुन बजेट मधील सर्व हालवा मनुवादी भांडवलदारी व्यवस्था लाटत आहे. अबकड या असंवैधानिक न्यायालयाने दिलेल्या निर्णायाचा मनुवाद्याना हवा तसा अर्थ लावून दीनदलित, आदिवासी, ओबीसी यांच्या सर्वच प्रकारच्या आरक्षणाला सुरंग लावला आहे. नवीन शिक्षण नीती २०२० मागच्या दाराने लागू करुन शिक्षण व्यवस्थेचा खेळखंडोबा केला गेला आहे. अर्थव्यवस्थेचा कणा मोडला आहे. शोषित, वंचित, शेतकरी, कष्टकरी, कामगार, भिकेकंगाल झाले आहेत. ‘‘विद्यार्थी, तरुणांचे भवितव्य अंधकारमय झाले, महिलांची सुरक्षा, शिक्षण रोजगारा अभावी त्या पुर्ण परावलंबी झाल्या आहेत. त्यांच्या व्यथा वेदना मुक्या झाल्या आहेत. सरकारचा सर्वच उत्पन्नाचा भाग मनुवादी भांडवलदार खात आहेत अशा नैराश्य ग्रस्त परिस्थितीत चर्मकार पोटजातीनी पुढाकार घेऊन सर्व शोषितांच्या संविधान दत्त अधिकाराच्या सुरक्षिततेसाठी संघटन करत बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवलेल्या दिशेने संघर्षासाठी सिद्ध करावे’’, असे विचार आज चर्मकार समाजाच्या सर्व पोटजाती विचारमंथन बैठकीत प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना धारावी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार बाबुराव माने यांनी व्यक्त केले.

या वेळी बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी अभियंता महापारेषण लक्ष्मीदास सोनकवडे हे होते. ही बैठक सोलापूर डाकबंगला सभागृहात संपन्न झाली.

यावेळी लक्ष्मीदास सोनकवडे यांनी बोलताना म्हणाले की, ‘‘आरक्षण गेले आहे. सगळ्याच क्षेत्रात खाजगीकरण, कंत्राटी कामगार नोकरवर्ग नेमणुका व शासकीय रिक्त जागा न भरणे या भांडवलशाही षडयंत्रामुळे परिस्थिती निराशाजनक आहे. मनुवादी भांडवलदारांचे सरकार बदलले संविधान वादी सरकार आले तरच काहीतरी आपला उद्धार होण्याची आशा आहे. आपल्यातील धनवानानी एकत्र येऊन आपल्या शिक्षण संस्था, अर्थकारणासाठी पतपेढ्या उभे करावेत त्या साठी संघटीत व्हावे लागले’’ असे मत व्यक्त केले.

या प्रसंगी नव स्थापित, ‘भारतीय संविधान प्रबोधन समिती सोलापूर’चे नुतन अध्यक्ष फारुख शेख व सचिव शाहिर रमेश खाडे, विठ्ठलराव व्हनमोरे यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी बाबुराव म्हेत्रे, ॲड. केशव इंगळे, सिद्राम सनके, तुकाराम कांबळे, फारुख शेख, अंगद जाधव, तिप्पण्णा इंगळे, ब्रह्मानंद धडके, रामलिंग शिंदे, शाम पाखरे यांची समयोचित भाषणे झाली.

या प्रसंगी विठ्ठलराव व्हनमोरे, गंगाधर सोनवणे, सटवाजी होटकर, रायबा खरटमल, गणेश शिंदे, हणमंत काळे, विठ्ठल कांबळे, वैगेरे लोकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

प्रारंभी चर्मकार समाज शहर अध्यक्ष शाहिर रमेश खाडे यांनी बैठकीची प्रस्तावना मांडली तर सच्चिदानंद व्हटकर यांनी सुत्रसंचालन केले तर सटवाजी होटकर यांनी आभार मानले.

# व्हॉट्सॲपवर समन्स पाठवले म्हणजे नोटीस मिळालीच असे नाही! दिल्ली उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल; १० लाखांच्या एकतर्फी आदेशाला आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

: न्यायालयीन नोटीस किंवा समन्स व्हॉट्सॲपवर पाठवण्यात आले म्हणून संबंधित व्यक्तीला ती प्रत्यक्षात मिळाली आणि त्याला न्यायालयीन कारवाईची माहिती झाली, असे सरसकट मानता येणार नाही, असा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे. केवळ मोबाईल क्रमांकावर समन्स पाठवले गेले, एवढ्यावरून समन्सची कायदेशीर सेवा सिद्ध होत नाही, असे न्यायमूर्ती मनोज कुमार ओहरी यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणात न्यायालयासमोर मूलभूत प्रश्न होता तो म्हणजे व्हॉट्सॲपवर संदेश पाठवला जाणे आणि तो संबंधित व्यक्तीने प्रत्यक्ष पाहणे किंवा स्वीकारणे, या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत का? दिल्ली उच्च न्यायालयाने या दोन्ही गोष्टी वेगळ्या असल्याचे स्पष्ट करत अधिक सावध न्यायालयीन तपासणीची गरज अधोरेखित केली.

प्रकरणाची पार्श्वभूमीही महत्त्वाची आहे. संबंधित दिवाणी खटला अनधिकृत बांधकाम, पाण्याच्या झिरपण्यामुळे झालेली हानी आणि ये-जा करण्याच्या मार्गात कथित अडथळा यासंदर्भात होता. या प्रकरणात अपीलकर्त्यासह इतर प्रतिवादींना जून २०२२मध्ये एकतर्फी कारवाईला सामोरे जावे लागले. त्यानंतर खटल्याचा निकाल नोव्हेंबर २०२३मध्ये देण्यात आला. कनिष्ठ न्यायालयाने प्रतिवादीविरुद्ध एकतर्फी हुकूम देताना १० लाखांची नुकसानभरपाई मंजूर केली आणि प्रतिबंधात्मक आदेशही जारी केले.

यानंतर अपीलकर्त्याने दिवाणी प्रक्रिया संहितेतील आदेश ९ नियम १३ अंतर्गत अर्ज दाखल करून हा एकतर्फी निकाल रद्द करण्याची मागणी केली. त्याचा दावा स्पष्ट होतात्याला समन्स कधीच मिळाले नाहीत आणि या न्यायालयीन प्रकरणाची कोणतीही माहिती त्याला नव्हती.

मात्र कनिष्ठ न्यायालयाने त्याचा अर्ज फेटाळला. त्यानंतर त्याने दिल्ली उच्च न्यायालयात अपील केले. अपीलकर्त्याने न्यायालयाला सांगितले की, त्याला या एकतर्फी आदेशाची माहिती जुलै २०२५मध्ये मिळाली. उच्च न्यायालयातील अन्य कार्यवाहीसंदर्भातील कागदपत्रे त्याला व्हॉट्सॲपवर पाठवण्यात आल्यानंतर त्याला या प्रकरणाची माहिती झाली, असा त्याचा दावा होता.

या प्रकरणात समन्सशी संबंधित एक महत्त्वाचा पुरावाही समोर आला. समन्स ज्या मोबाईल क्रमांकाशी संबंधित व्यक्तीला पाठवण्यात आले होते, त्या क्रमांकावर फोन केल्याचा उल्लेख प्रक्रिया पार पाडणाऱ्या अधिकाऱ्याच्या अहवालात होता. मात्र फोन स्वतः अपीलकर्त्याने न उचलता तिसऱ्या व्यक्तीने उचलला, अशी नोंद अहवालात होती. त्याचवेळी अपीलकर्ता सुरुवातीपासूनच समन्स मिळाल्याचा दावा नाकारत होता.

याच परिस्थितीवर न्यायालयाने विशेष भर दिला. मोबाईल क्रमांक अस्तित्वात असणे आणि त्या क्रमांकावर समन्स पाठवले जाणे हे एक सत्य; पण ते समन्स संबंधित व्यक्तीने प्रत्यक्ष स्वीकारले, हे सिद्ध करणे वेगळे सत्य, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायालयाने नमूद केले की, तिसऱ्या व्यक्तीने फोन उचलल्याची नोंद आणि अपीलकर्त्याने सातत्याने समन्स मिळाल्याचे नाकारले असल्यामुळे प्रकरणाकडे अधिक काळजीपूर्वक पाहणे आवश्यक होते. यामुळे दिल्ली उच्च न्यायालयाने आदेश ९ नियम १३ अंतर्गत अपीलकर्त्याच्या बाजूने निर्णय देत, कनिष्ठ न्यायालयाने त्याचा अर्ज फेटाळण्याचा घेतलेला निर्णय बाजूला केला.

या निकालाचा व्यापक परिणाम न्यायालयीन प्रक्रियेच्या डिजिटल युगाशी संबंधित आहे. व्हॉट्सॲप, संदेश आणि मोबाईल क्रमांक हे न्यायालयीन संवादासाठी उपयुक्त माध्यम असले तरी ‘पाठवले’ म्हणजे ‘मिळाले’ आणि ‘मिळाले’ म्हणजे ‘न्यायालयीन नोटीसची प्रत्यक्ष माहिती झाली’, असा सरळ निष्कर्ष काढता येणार नाही.

विशेषतः एकतर्फी निकाल देण्यापूर्वी संबंधित पक्षाला योग्य आणि प्रभावी नोटीस मिळाली होती का, याची खात्री करणे आवश्यक असल्याचे या निर्णयातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

डिजिटल संदेश न्यायालयीन प्रक्रियेचा वेग वाढवू शकतो; पण न्यायाच्या नावाखाली ‘पाठवले’ या एका क्लिकवर नागरिकाचा हक्क संपवता येणार नाहीदिल्ली उच्च न्यायालयाचा हा निकाल त्याच मूलभूत तत्त्वाची आठवण करून देतो.